Name Of Work: - Construction of SWM project with alied Civil work at Unique Garden, MBMC

"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधा विकास" योजनेअंतर्गत कामांना मान्यता देण्याबाबत

मिरा-भाईंदर मनपा,सन २०२२-२०२३
रू.२१५.०० कोटी लेखाशिर्ष (२२१७ ०१९३)

| | |
|---|---|
| पा. / विभाग | |
| आ. क्र. | ८८० |
| दिनांक | १२/१०/२२ |

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १० ऑक्टोबर,२०२२.

वाचा :-

(१) शासन निर्णय, क्र. शासन निर्णय क्रमांक-धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२ डिसेंबर, २०१७ व दिनांक ३०सप्टेंबर,२०२०.

(२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३,दिनांक ४ एप्रिल २०२२

(३) शासन निर्णय, क्र. शासन निर्णय क्रमांक- मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दिनांक १७ जुन, २०२२.

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिकांना मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामास विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्रमांक (३) अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रू.३५.०० कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर कामांसाठी एकूण रू.२५० कोटी एवढ्या निधीची आवश्यकता असल्याने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने कामांच्या उर्वरित निधीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास"** योजनेअंतर्गत मिरा-**भाईंदर** महानगरपालिका क्षेत्रातील सोबत जोडलेल्या कामासाठी रु.२१५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे पंधरा कोटी मात्र) इतक्या रक्कमेच्या कामास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे व निधी वितरण तसेच सदर निधी टप्प्या टप्प्याने वितरीत करण्यासही मान्यता देण्यात येत आहे व निधी वितरणाचे शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२. सदर प्रकल्पा अंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा "महानगरपालिका" राहील.

३. "संदर्भ क्र. ३ शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या निधीसह सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा (रू.२५०.०० कोटी) राज्य शासनाचा राहील.

४. संदर्भाधीन क्र. (१),(२) व (३) शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

30/10/2022

(श्रीकांत आंडगे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. विभागीय आयुक्त, कोकण
४. जिल्हाधिकारी,ठाणे
५. आयुक्त, महानगरपालिका,मिरा-भाईंदर
६. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१२. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
१३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१५. जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे
१६. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. कार्यासन नवि-४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

# शासन निर्णय क्रमांक- मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/न.वि.-१६, दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ सोबतचे विवरणपत्र

## मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कामे

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रकल्प किंमत रक्कम | संदर्भ क्र.३ अन्वये वितरीत निधी | उर्वरित निध |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फाऊंटन हॉटेल समोरील मेरी टाईम बोर्डाच्या जागेमध्ये प्रवासी जेट्टी जवळ चौपाटी विकसित करण्यासाठी | १०००.०० | ५००.०० | ५००.०० |
| २ | वर्सोवा ब्रिज ते घोडबंदर गावाशेजारी खाडी किनारा विकसित करण्यासाठी | १५०००.०० | ५००.०० | १४५००.० |
| ३ | प्रभाग क्र. १४ काशिमिरा येथील महानगरपालिकेच्या उद्यानासाठी आरक्षित असलेल्या जागेवर ऑलम्पिक साईज तरण तलाव व जिमनॅशियम बांधण्यासाठी. | १०००.०० | ५००.०० | [illegible] |
| ४ | प्रभाग क्र. १८ मंगलनगर परिसरातील उद्यानाच्या आरक्षित भुखंडावर ऑलम्पिक साईज तरण तलाव व जिमनॅशियम बांधण्यासाठी. | १०००.०० | ५००.०० | ५००.०० |
| ५ | प्रभाग क्र. ५ सेव्हन इलेव्हन शाळेशेजारील मैदानाच्या १५% जागेवर ऑलम्पिक साईज तरण तलाव व जिमनॅशियम बांधण्यासाठी. | १०००.०० | ५००.०० | ५००.०० |

१८.१० ३०/१०/२०२२

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रकल्प किंमत रक्कम | संदर्भ क्र.३ अन्वये वितरीत निधी | उर्वरित |
|---|---|---|---|---|
| ६ | प्रभाग क. ३ मधील सचिन तेंडूलकर मैदानावरील १५% जागेवर ऑलम्पिक साईज तरण तलाव व जिमनॅशियम बांधण्यासाठी. | १०००.०० | ५००.०० | ५००.०० |
| ७ | मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ३ साईबाबा नगर, प्रभाग क्र. ४ मधील महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालयाशेजारी, प्रभाग क्र. १० घोडदेव गावातील तलावाशेजारी, प्रभाग क्र ११ नवघर गावातील मैदानाशेजारी, प्रभाग क्र. १२ स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानाशेजारी, प्रभाग क्र. १३ सेव्हन इलेव्हन शाळेशेजारी, प्रभाग क्र. १३ तिवारी कॉलेज शेजारी, प्रभाग क्र. १४ काशिमिरा तलावाशेजारी, प्रभाग क्र. १४ महाजनवाडी परिसरात, प्रभाग क्र. १८ जी.सी.सी. क्लब शेजारी या परिसरामध्ये कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रत्येकी ५ कोटी रूपये याप्रमाणे. | ५०००.०० | ५००.०० | ४५००.०० |
| | एकुण रक्कम रुपये लक्ष | २५०००.०० | ३५००.०० | २१५००.०० |